# विशेष खटला क्र.१२२/२०२५ मधील नि.क्र.१८ वरील आदेश

(CNR NO.MHPU14-001422-2025)

(पारीत दिनांक – २३.०२.२०२६)

१. अर्ज व त्यावरील प्रतिपक्षाचे म्हणणे वाचले.

२. उभय पक्षांच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

३. फिर्यादीने त्यास जामीन अर्जाची मराठी भाषेची प्रत पुरवावी तसेच रोजनाम्यातील ''फिर्यादीने जामीन अर्जाची प्रत घेतली नाही'' ही नोंद रद्द करावी व जामीन अर्जाचा अभ्यास करणेकरीता प्रकरण पुढे ठेवण्यात यावे अशी विनंती केली.

४. विद्वान सरकारी अभियोक्ता यांनी ते फिर्यादी यांना आरोपींनी दाखल केलेल्या इंग्रजी भाषेतील जामीन अर्जाची माहिती मराठी भाषेत सांगण्यास तयार असल्याचे नमूद केले.

५. प्रस्तुत प्रकरणात फिर्यादीकरीता जामीन अर्जाची प्रत याआधीच आरोपीतर्फे अभिलेखावर सादर करण्यात आली आहे. ती प्रत फिर्यादीस दि.०९.०२.२०२६ रोजी देवू करण्यात आली असता फिर्यादीने सदर प्रत स्विकारण्यास स्पष्ट नकार दिला होता. प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादीचे एकंदर वर्तन पाहता सदर बाबीची नोंद प्रकरणात घेणे आवश्यक वाटल्याने सदर बाब रोजनाम्यात नोंदविण्यात आली होती. त्यामुळे वस्तुस्थितीप्रमाणे दर्शविण्यात आलेली बाब रोजनाम्यातून काढता येवू शकत नाही. सबब रोजनाम्यातील दुरुस्तीची विनंती ही अनुचित असल्याने ती नामंजूर करणे न्यायोचित होईल.

६. फिर्यादी यांना त्यांच्या न्याय हक्काचे संरक्षण होण्याकरीता तालुका विधी सेवा समितीतर्फे कायदेशिर मदत पुरविण्यात आलेली आहे व त्या अनुशंगाने ॲड. श्रीमती प्रिती

गावडे यांची नेमणुक करण्यात आली आहे. तसेच विद्वान सरकारी अभियोक्ता यांनी ते फिर्यादी यांना सहकार्य करीत असल्याचे तसेच जामीन अर्जाचे मराठी भाषेचे अनुवाद तसेच माहिती ते देण्यास तयार असल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे. अशा परिस्थितीत, फिर्यादी यांनी त्यांना जामीन अर्जाची प्रत मराठी भाषेत पुरविण्यात यावी असा केलेला हट्ट हा योग्य व कायदेशिर वाटत नाही. फिर्यादी यांना त्यांचे विद्वान सरकारी अभियोक्ता यांच्याशी संपर्क साधून प्रकरणातील कार्यवाही समजून घेण्याची पूर्ण मुभा आहे. अशा परिस्थितीत, जामीन अर्जाची प्रत मराठी भाषेत पुरवावी व तोपावेतो जामीन अर्ज प्रलंबित ठेवावेत अशी फिर्यादी यांनी केलेली मागणी न्यायोचित वाटत नाही. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज नि.क्र.१८ नामंजूर करण्यात येतो.

२. फिर्यादी यांनी जामीन अर्जातील माहिती समजण्यासाठी विद्वान सरकारी अभियोक्ता व तालुका विधी सेवा समिती तर्फे नेमण्यात आलेले वकिल श्रीमती प्रिती गावडे यांची मदत घ्यावी व त्यांच्या मदतीने सदर जामीन अर्जाचा अनुवाद करुन घ्यावा असा आदेश करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by HETENDRA ANILKUMAR WANI
Date: 2026.02.24 13:27:38 +0530

(**हितेंद्र उर्मिला अनिलकुमार वाणी**)

दिनांक – २३.०२.२०२६ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, बारामती.